# प्रकरण - ५ वे

## निष्कर्ष

# प्रकरण ५ वे

## निष्कर्ष

५·१ वैयक्तिक माहिती

५·२ टोळी अथवा गटाचे स्वरुप

५·३ य ) कौटुंबिक माहिती
र ) उपलब्ध सुखसोई व गैरसोयी

५·४ कामाची स्थिती

५·५ ऊसतोडणी कामगाराच्या आर्थिक बाजू

५·६ आरोग्यविषयक सुविधा आणि त्यांचे स्वरुप

५·७ इतर सामाजिक बाबी (धर्म,जात,व्यसने इ·)

# प्रकरण - ५ वे

## निष्कर्ष

उसतोडणी कामगारांच्या या अभ्यासातून ग्रामीण भागात निर्माण होत असलेल्या औद्योगिक अकुशल अशा स्थलांतरित व कराराने कामावर घेतल्या गेलेल्या कामगारांच्या सामाजिक, आर्थिक, जीवनाचा आढावा घेण्याचा प्रयत्न करण्यात आला. त्यातून त्यांच्यापुढील समस्या आणि त्यांची कारणे यावर प्रकाश टाकण्यात आला आहे. उसतोडणी कामगारांच्या समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून अभ्यास करण्यासाठी कराड तालुका हे क्षेत्र निवडून या तालुक्यातील दोन सहकारी साखर कारखान्यासाठी काम करणा-या उसतोडणी कामगारांची निवड केली होती.

कराड तालुक्यातील उसतोडणी कामगारांच्या समाजशास्त्रीय अभ्यास करताना उपलब्ध झालेल्या माहितीच्या विश्लेषणावरुन उसतोडणी कामगारांच्या वैयक्तिक माहितीबाबत, गटाविषयी, त्यांच्या कुटुंबा - विषयी उपलब्ध सुखसोयी विषयी, कामाच्या स्थितीविषयी, आर्थिक , आरोग्यविषयक व इतर सामाजिक बाबीविषयी पुढील महत्वपूर्ण निष्कर्ष प्राप्त झाले.

### ५.१ वैयक्तिक माहिती :

वयोगट ४८ नंतर उसतोडणी कामगार उसतोडणी काम करण्यास असमर्थ ठरतो. इतके हे काम त्रासदायक आहे.

उसतोडणी कामगारामध्ये स्त्री कामगारांची संख्या पुरुष उसतोडणी कामगारापेक्षा कमी आहे.

वयोगट १८ ते २८ मध्ये स्त्रियांच्यावर मुलांची, संसाराची जबाबदारी जास्त नसल्याने या वयोगटातील स्त्रियांत उसतोडणी कामगारांचे प्रमाण जास्त आढळते तर २९ ते ३८ या वयोगटात पुरुष उसतोडणी कामगारांचे प्रमाण जास्त आढळते. विवाहानंतर वैवाहिक जबाबदा-यामुळे ( विभक्त कुटुंब, विवाहानंतर कुटुंब जबाबदारी ) त्यांच्या प्रमाणात वाढ होत असावी.

उसतोडणी कामगारांच्यामध्ये विवाहित जोडप्यांचे प्रमाण सर्वात जास्त आढळते.

उसतोडणी कामगार उसतोडणीचे काम स्वीकारतो याचे मूळ जातीव्यवस्थेत नाही तर आर्थिक स्थितीत आहे.

उसतोडणी कामगारांच्यामध्ये अशिक्षितांचे प्रमाण जास्त आहे.

कराड तालुक्यात उसतोडणीचे काम करणा-या कामगारात मराठी भाषिकांचे प्रमाण सर्वात जास्त आहे.

पण अलिकडे अन्य भाषिक पर्यायाने सीमेवरील लोक देखील त्यांच्यात आढळत आहेत.

उसतोडणी कामगारामध्ये अल्पप्रमाणातील शेती व शेतमजुरी करणारांचे प्रमाण सर्वात जास्त आहे.

कराड तालुक्यातील ऊसतोडणी कामगारामध्ये बीड जिल्हया-तील कामगारांचे प्रमाण सर्वात जास्त आहे.

४00 ते ५00 कि.मी. अंतरावरुन आलेल्या कामगारांचे प्रमाण सर्वात जास्त आहे. मजूरी उपलब्ध व्हावी यासाठी ग्रामीण मजूर इतक्या अंतरापर्यंत प्रवासी वृत्ती ठेवतात.

कृष्णा सहकारी साखर कारखान्यातील मजुरांची संख्या सहयाद्री सहकारी साखर कारखान्यापेक्षा जास्त आहे.

५.२ <u>टोळी अथवा गटाचे स्वरुप</u> :

गट अथवा टोळीमध्ये १५ ते २0 सदस्य असलेल्या व ८ ते १0 कुटुंबे असलेल्या गटांचे अथवा टोळ्यांचे प्रमाण सर्वात जास्त आहे.

गट अथवा टोळ्यांच्यामध्ये एकमेकांचे नातेवाईक असणारे ऊसतोडणी कामगार आढळतात. निम्म्यापेक्षा जास्त टोळयात नातेवाईकांचे प्रमाण आढळते.

ज्या टोळयामध्ये आपसात नातेवाईकांचे प्रमाण जास्त आढळत नाही त्यांच्यात भांडणांचे प्रमाण जास्त आहे.

त्यांच्यात मद्यपानासारख्या व्यसनामुळे भांडणे जास्त प्रमाणात होतात.

५.३ य) <u>कौटुंबिक माहिती</u> :

मूळ गांवाकडे एकत्र कुटुंबपध्दती व जास्त कुटुंब सदस्य असलेल्या

ऊसतोडणी कामगारांचे प्रमाण जास्त आहे.

ऊसतोडणी कामगारांच्यामध्ये कुटुंब प्रमुख पद स्त्रियांच्याकडे असल्याचे प्रमाण अपवादात्मक आढळते.

कामाच्या ठिकाणी असलेल्या कुटुंबसदस्यांचे ( वयोगट १८ च्या आतील ) प्रमाण एकूण सदस्यांच्या निम्म्यापेक्षा जास्त आहे.

कामाच्या ठिकाणी वयोगट १८ च्या आतील सदस्य येत असल्याने त्यांचेही शिक्षण खुंटते. तसेच १८ वयोगटावरील लोकांच्यातही अशिक्षित प्रमाण जास्त आहे. थोडक्यात बरोबर असलेल्या कुटुंब सदस्यात देखील अशिक्षितांचे प्रमाण जास्त आहे.

५.३ र) उपलब्ध सुखसोयी व गैरसोयी :

ऊसतोडणी कामगार हे स्वत:ची मालकी नसलेल्या झोपडयातून अथवा खोपटातून रहातात.

ऊसतोडणी कामगार जवळ - जवळ ६ ते ७ महिने कारखाना परिसरात रहातात. जे ऊसतोडणी कामगार कारखान्याच्या अगदी जवळ रहातात व बैलगाडीने ऊसवहातूक करून दररोज कारखान्याजवळ मुक्कामाला येतात. अशा कामगारांच्यासाठी तरी कायमस्वरुपाची अशी निवास व्यवस्था करता येणे शक्य होईल काय ? याचा विचार होणे आवश्यक आहे.

ऊसतोडणी कामगारांना सांडपाणी व्यवस्था, पाण्याची सोय, संडासव्यवस्था, स्नानगृहे या सोयी ब-याच प्रमाणात त्यांना कामाच्या ठिकाणी उपलब्ध होऊ शकत नाहीत.

उसतोडणी कामगारांना आपल्या झोपडीत उजेडासाठी रॉकेलच्या दिव्याशिवाय पर्याय नाही. त्यामुळे पालापाचोळ्याने बांधलेल्या झोपडयांना आग लागून मनुष्यहानी होण्याचा संभव आहे. तशी उदाहरणे घडलेली आहेत.

उसतोडणी कामगारांना कामाच्या ठिकाणी येताना जी आवश्यक अशी चार-दोन भांडी लागतात ती देखील ते तेथे नवीन खरेदी करु शकत नाहीत. त्यांना मूळ गांवाकडूनच ती आणावी लागतात.

५.४ कामाची स्थिती :

उसतोडणी कामगाराची कामावर निवड करण्यापासून शेवट-पर्यंत कंत्राटदार किंवा मुकादम हा महत्वाचा घटक कार्य करीत असतो.

जेथे मुकादमाच्या अनेक टोळ्या आहेत. तेथे टोळीचा किंवा गटाचा प्रमुख कामावर देखरेख ठेवण्याचे कार्य करीत असतो व ज्या मुकाद-माची एकच टोळी अथवा गट आहे तो स्वत: कामावर देखरेख ठेवतो.

उसतोडणी कामगार हे स्त्री व पुरुष अशी कामाची विभागणी करुन श्रमविभाजन करतात. स्त्रियांना झेपतील अशी कामे त्यांच्याकडे दिली जातात. औद्योगिकरणातील " श्रमविभाजन " या संकल्पनेचा ते आपोआप वापर करीत आहेत. परंतु त्यातही नातेसंबंधावर बरेच कांही अवलंबून आहे.

उसतोडणी कामगारांना काम करताना संकट आल्यास ओढवणा-या प्रसंगाबाबत कारखाना त्यांच्या सुरक्षिततेची काळजी घेतो की नाही याबाबत शंका वाटते. उसतोडणी कामगारासाठी कामगार

अधिकारी कितपत काम करतात याबाबतही शंका वाटते.

करा‍ड तालुक्यातील ऊसतोडणी कामगारांच्यामध्ये संघटनात्मक ऐक्य निर्माण करुन आपल्या हक्कांची जाणीव निर्माण करण्याचे कार्य संघटनानेत्यांनी चांगले केले आहे असे दिसून येते.

५.५ <u>ऊसतोडणी कामगाराच्या आर्थिक बाजू</u> :

सर्वच ऊसतोडणी कामगार हे ज्या ग्रामीण भागातून आले आहेत तेथील बँन्कींगच्या सुविधा अपु-या असू शकतील. त्यामुळे कदाचित त्यांच्यात बँन्कींगच्या सवयींचा अभाव आहे, असे वाटते.

राष्ट्रीयकृत बँन्काना ग्रामीण भागातील सावकारीचेच उच्चाटन करावयाचे नसून बँन्काच्या शाखाचा विस्तार ग्रामीण भागात करुन लोकामध्ये बँन्कींगच्या सवयी वाढवावयाच्या आहेत. या मताप्रमाणे पहावयास गेल्यास ऊसतोडणी कामगारामध्ये बँन्कींगच्या सवयींचा अभाव का झाला आहे, याचा शोध घेऊन त्यांना या सवयी लावणे महत्वाचे ठरणार आहे.

शैक्षणिक परिवर्तनामुळे मुकादम आपले शोषण करतो. याची जाणीव ऊसतोडणी कामगारांना होत आहे.

ऊसतोडणी कामगारांची उत्पन्न मर्यादा अत्यंत कमी आहे. दरदिवशी कोयत्याला सरासरी अंदाजे १९.४१ एवढे उत्पन्न त्यांच्या कुटुंबियांचा खर्च भागविण्यास अत्यंत अपुरे आहे.

ऊसतोडणी कामगारांचा आर्थिक दर्जा सुधारण्यासाठी त्यांना जास्तीत जास्त प्रमाणात पशुपालन, बैलगाडी (टायर बैलगाडी) यांच्या

सोयी उपलब्ध होणे आवश्यक आहे.

उसतोडणी कामगारांचे शोषण करणा-या मुकादमाकडूनच त्यांने कर्ज घेतल्यामुळे तो त्याच्या अंकित रहातो. मुकादमाना शोषणासाठी उसतोडणी कामगारांची आर्थिक हतबलता खूपच फायदेशीर ठरते.

उसतोडणी कामगार किमान ५00 व कमाल १000 या कर्जमर्यादेत अडकून राहिला आहे. एकंदरीत मुकादमांच्या फसवणुकीच्या धोरणामुळे तो या कर्जातून कित्येक हंगाम होऊनसुध्दा सुटू शकत नाही.

उसतोडणी कामगारामध्ये कर्जबाजारीपणाचे प्रमाण १00 % आहे.

कर्जाच्या दुष्टचक्रातून त्यांना सोडविण्यासाठी सहकारी साखर कारखाने, वित्तसंस्था व शासन यांच्या प्रयत्नाचीच आवश्यकता आहे.

उसतोडणी कामगारांनी घेतलेल्या कर्जाचा वापर एकतर त्यांनी उपभोगासाठी किंवा अनुत्पादक कार्यासाठी ( लग्नखर्च, घर - बांधणी ) केला आहे. जुन्या कर्जफेडीसाठी नवीन कर्ज हे प्रमाण देखील खूपच आढळते.

येथे कर्जाचा भार एका पिढीवरुन दुस-या पिढीवर चालत येतो. कर्जफेडीसाठी उसतोडणी कामगारावर इतर औद्योगिक कामगारा-प्रमाणे अध्यात्मिक, सामाजिक व कायदेशीर बंधने पडलेली आहेत, असे दिसून येते.

५.६ आरोग्य विषयक सुविधा आणि त्यांचे स्वरुप :

जवळ जवळ ३७% ऊसतोडणी कामगार हे सरकारी अथवा खाजगी दवाखाना, कारखान्याकडून औषधोपचार, आरोग्य निरीक्षकाची सोय, रोगनिदान शिबीरांचा लाभ यांच्यापासून दूर लोटला गेला आहे.

कृष्णा सहकारी साखर कारखाना व सहयाद्री सहकारी साखर कारखाना यांना या कामगारांच्यासाठी वैद्यकिय सुविधा उपलब्ध करुन देण्यास अडथळे निर्माण होणार नाहीत अशी त्यांची आर्थिक स्थिती आहे. त्यामुळे या सुविधा त्यांनी करुन देणे कामगार कल्याणाच्या दृष्टीने हितावह ठरणार आहे.

ऊसतोडणी कामगार हे आरोग्याच्या बाबतीत जास्त काळजी घेत नाहीत. शैक्षणिक प्रभावामुळे त्यांच्यामध्ये आरोग्याच्या बाबतीत मतपरिवर्तन होत आहे असे दिसते.

ऊसतोडणी कामगारामध्ये शैक्षणिक प्रगती फारच अल्प वाटते तरी साक्षरता प्रसार, साखरशाळा या माध्यमातून त्यांच्यात आरोग्याच्या बाबतीत बरेच परिवर्तन घडवून आणणे शक्य आहे.

ऊसतोडणी कामगारावर मोठ्या जखमा होण्यासारखे दुर्धर प्रसंग अनेक वेळा येत असतात.

उपरोक्त प्रसंगाना तोंड देण्यासाठी प्रथमोपचाराचे प्रशिक्षण मुकादम अथवा टोळीचा प्रमुख यांना दिले तर ते फायदेशीर ठरु शकेल.

ज्या ऊसतोडणी कामगारानी कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करवून घेतली आहे त्यांच्यात सक्ति अथवा फसवणुकीमुळे शस्त्रक्रियेचे प्रमाण जास्त

आढळते. ऊसतोडणी कामगारांच्या बाबतीत समाजातील इतर दारिद्र्यात पिचलेल्या लोकांच्या प्रमाणेच कुटुंब नियोजन ( कल्याण ) कार्यक्रमाबाबत वैचारिक परिवर्तन होणे अत्यंत महत्वाचे आहे.

५.७ इतर सामाजिक बाबी ( धर्म, जात, व्यसने इ. ) :

ऊसतोडणी कामगार कितीही कष्टप्रद जीवन जगत असला तरी देखील जातीव्यवस्थेच्या बाबतीत त्यांच्यातील निर्बंध सैलसर झालेला नाहीत. परंतु शैक्षणिक प्रभावामुळे जाती-व्यवस्थेबाबत शैथिल्याची भावना देखील त्यांच्यात आढळत आहे.

एकंदरीत धर्म व जादू याबाबतीत ऊसतोडणी कामगारातील जास्त शैक्षणिक दर्जा असलेले व अगदीच अशिक्षित कामगार यांच्या मनाची अवस्था दोलायमान आहे.

ऊसतोडणी कामगार व्यसनांसाठी अधिक खर्च करु शकत नाहीत.

मूळ गांवाशी पत्रव्यवहार करताना देखील त्यांना मुकादमावर अवलंबून रहावे लागते.

ऊसतोडणी कामगार करमणुकीच्या सोयीपासून खूपच मोठया प्रमाणात वंचित राहिलेला आहे.

-x-x-x-x-x-